# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि.०४ एप्रिल २०२३

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २१०/२०२३ भादंविसक ३५३,३३२,३३३,१४३,१४७,१४९,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०३/०४/२०२३ रोजी ११.०० वा. पोलीस अशोक रेस्ट हाऊस ते मसिजदचे बाजूस सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/४/२०२३ रोजी २०.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संतोष मुरलीधर जाधव,वय-४७ वर्षे, व्यवसाय- एमएसईबी मध्ये नोकरी, रा- ३३२४,जुनी मिल चाळ मुरारजी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सलीम शेख, २) सोहेले अत्तार, ३) इम्रान व इतर ३ इसम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०३/०४/२०२३ रोजी ११.०० वा. पोलीस अशोक रेस्ट हाऊस ते मसिजदचे बाजूस सोलापूर येथील विजेचे तारेचे मध्ये येणारे झाडांचे फांदी तोडत शासकीय काम करत असताना क्लासिक गॅरेज मधील नमुद आरोपीत मजकूर यांनी फिर्यादीस व फिर्यादीसोबत असलेले एमएसईबीचे कर्मचारी यांना शिवीगाळ करत झाडे का तोडलात असे म्हणून फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली त्यामुळे फिर्यादीचे नाकास जखम होवून रक्तस्त्राव सुरू झाले त्यानंतर फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली म्हणून.तपास- सपोनि दांडगे- ९९२३३४५२८० |

## जेलरोड पोलीस पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १३७/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २८/०३/२०२३ रोजी १३.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरासमोरून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०४/२०२३ रोजी ००.३६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नागनाथ विठोबा सामल,वय-५२ वर्षे,रा- १६७१,कुचन नगर शाकभरी देवी मंदिर जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १५,०००/- रू ची टीव्हीएस कंपनीची सुपर एचडी काळया रंगाची मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ बी सी ६४०९ ही वरील ठिकाणी पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास- पोह/५९-चव्हाण- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २२५/२०२३ भादंविसक २७९,३३७,३३८,सह मोवाकाक १८४,१७७,१३४ (ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २६/०३/२०२३ रोजी १९.१५ वा. सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृहाच्या कंपाऊडच्या लगत सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०४/२०२३ रोजी २३.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | ईराण्णा सिद्राम धनाश्री,वय-५५ वषे,रा- घोंगडे वस्ती भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एक अज्ञात पांढऱ्या रंगाची चारचाकी कार चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २६/०३/२०२३ रोजी १९.१५ वा च्या सूमारास यातील फिर्यादी व त्यांची पत्नी असे मिळून मो.सायकल क्र एमएच १३ बीवाय १९७६ यावरून रेल्वे स्टेशन जवळील शनी मंदिरला जात असताना नमुद ठिकाणी आले असता एक अज्ञात पांढऱ्या रंगाची चारचाकी कार चालकाने त्यांचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्ठाजीपणे व अविचाराने चालवून पाठीमागून फिर्यादीस ओव्हरटेक करताना फिर्यादीचे मो.सायकलीस उजव्या बाजूने धडक दिल्याने फिर्यादी व त्याची पत्नी सविता खाली पडले त्यात फिर्यादीचे डाव्या डोळयाच्या बाजूस डाव्या गुडघ्यास मुका मार लागून जखम झाली असून |

| | | |
|---|---|---|
| | | उजवा हात फ्रॅक्चर व फिर्यादीचे पत्नीस उजव्या बाजूस तीन बरगडी फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत करणेस कारणीभूत झाला आहे.म्हणून.तपास- मपोह/७७१/चव्हाण- |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १७८/२०२३ भादंविसक ३८०,४५४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०३/०४/२०२३ रोजी १०.३० वा ते १८.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०४/२०२३ रोजी २३.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उमेश किसन केकडे,वय-५३ वर्षे,रा- १३,होमकर नगर ५४ ब भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेलामाल** | | १,२०,०००/- त्यात ०४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी,३ ग्रॅमचे सोन्याची अंगठी,३ ग्रॅमचे सोन्याचे कानातील फुले,५ ग्रॅम सोन्याचे बाळाची मनगटी, ५ ग्रॅमचे सोन्याचे ५ कॉईन, २०० ग्रॅमचे चांदीचे २० कॉईन ,रोख रक्कम असे जुवाकिअंदाजे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे कोर्टात कामानिमित्त गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप उचकटून घरात प्रवेश करून घरातील सामाना आस्थाव्यवस्थ करून बेडरूममधील लोंखडी कपाट व लॉकर उचकटून नमुद वर्णनाचे व किंमतीचे सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.तपास- पोसई ताकभाते - **९२८४६४९१७८** |